शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,अवसरी(खुर्द),ता-आंबेगाव,जिल्हा- पुणे,४१२४०५
GOVT. COLLEGE OF ENGINEERING & RESEARCH, AWASARI (KHURD), TAL-AMBEGAON, DIST-PUNE,412405
TEL NO.-02133-225900 E-MAIL: gcoeara@gmail.com
FAX NO.- 02133-230583 Website- www.gcoeara.ac.in

No. GCOEARA/NSS/2018/ 6145 Date : 19 SEP 2018

# सूचना

युनिसेफच्या सहकार्याने राज्यशासनाचे उच्च शिक्षण विभाग व तंत्रशिक्षण विभाग यांच्या प्रत्यक्ष सहभागाने आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने 'युवा माहिती दूत' हा उपक्रम राबविण्यात येत आहे. महाविद्यालयातील विविध शाखांमध्ये पदवी व ~~पदव्युत्तर~~ शिक्षण घेणाऱ्या युवकांमार्फत शासकीय योजनांची माहिती प्रस्तावित लाभार्थ्यांपर्यंत थेटपणे पोहचविणे हे या उपक्रमाचे वैशिष्ट आहे. युवा माहिती दूत म्हणून काम केल्यामुळे राज्यशासनाकरिता काम करण्याची महत्त्वाची संधी युवकांना मिळणार आहे. तसेच ठरवून दिलेले काम पूर्ण केल्यानंतर शासनाचे डिजिटल प्रमाणपत्र त्यांना देण्यात येणार आहे.

महाविद्यालयातील जे विद्यार्थी स्वेच्छेने या उपक्रमात सहभागी होण्यास तयार आहेत त्यांनी मोबाईलमधील Google Playstore आणि App Store वर उपलब्ध करून देण्यात आलेले युवा माहिती दूत हे विशेष अप्लिकेशन डाऊनलोड करून त्याद्वारे आपल्या नांवांची युवा माहिती दूत म्हणून दि. २३/०९/२०१८ रोजी पर्यंत नोंदणी करावयाची आहे.

अधिक माहितीसाठी श्री . एम. डी. पांचाळ, कार्यक्रम अधिकारी, रासेयो यांच्याशी संपर्क साधावा.

19/9/18

(डॉ. अ. शि. पंत)
प्राचार्य
शा. अ. व. सं. मं. अवसरी (खुर्द)

प्रत :- १) विभागप्रमुख : यंत्र/स्वयंचल/ स्थापत्य/संगणक/अणुविद्युत/उपकरणीकरण/उपयोजित विज्ञान यांना संबंधित विभागीय सूचनाफलकावर प्रदर्शित करण्यासाठी

2) सूचना फलक – मुख्य इमारत, मुलींचे वसतिगृह व मुलांचे वसतिगृह क्र. 1 व २

Scanned by CamScanner

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्रपेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१ फॅक्स : २२६९२१०२, २२६९०००७
E- mail : desk१७@dtemaharashtra.gov.in web : http://www.dtemaharashtra.gov.in

का.क्र.१९/डीटीई/युवा माहितीदूत/२०१८/ ९०
दिनांक: 3 1 JUL 2018

प्रति,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित,
अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/तंनिकेतन महाविद्यालये,
महाराष्ट्र.

विषय : - "युवा माहितीदूत" उपक्रम राबवण्याबाबत...

युनिसेफच्या सहकार्याने राज्य शासनाचे उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण आणि शिक्षण विभाग यांच्या प्रत्यक्ष सहभागाने "युवा माहिती दूत" उपक्रम राबविण्यात येत आहे. महाविद्यालयांमधील विविध शाखांमध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या युवकांमार्फत शासकीय योजनांची माहिती प्रस्तावित लाभार्थ्यांपर्यंत थेट देणे, हे युवा माहिती दूत उपक्रमाचे वैशिष्ट्य असून या उपक्रमाच्या माध्यमातून शासनाच्या योजना किमान एक कोटी नागरिकांपर्यंत पोहचविण्याचे उद्दिष्ट आहे.

यासाठी शासनाच्या विविध महत्त्वाच्या योजनांची निवड करण्यात आली असून या योजनांची माहिती युवा माहिती दुतांमार्फत प्रस्तावित लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे. या उपक्रमात आपल्या महाविद्यालयाने सहभागी व्हावे यासाठी आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना या उपक्रमाची माहिती द्यावी व जास्तीत जास्त संख्येने विद्यार्थी यामध्ये सहभागी होतील यासाठी प्रयत्न करावेत.

१. प्रत्येक महाविद्यालयाने या उपक्रमासाठी महाविद्यालयातील अध्यापक/ ग्रंथपाल/ अधीक्षक/ क्रीडा शिक्षक यापैकी एकाची 'युवा माहिती-दूत मार्गदर्शक' म्हणून नेमणूक करावी.

२. मार्गदर्शकाची कामे :

i. या उपक्रमासाठी तयार करण्यात आलेल्या मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये स्वतः ची नोंदणी करावी.

ii. उपक्रमासाठी आलेल्या युवकांच्या अर्जाची पडताळणी करून योग्यता तपासावी.

iii. पात्रता आणि निकष पूर्ण करणाऱ्या युवकांची निवड करावी व मोबाईल ॲप्लिकेशनमध्ये तशी नोंद करावी.

iv. निवड केलेले माहिती दूत करीत असलेल्या कामांचा दरमहा आढावा घेणे आणि त्याप्रमाणे विद्यार्थ्यांना माहिती दूत म्हणून पुढे काम करण्यास मान्यता देणे व न देणे.

v. महाविद्यालयाने नेमणूक केलेल्या मार्गदर्शकासाठी सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये दोन वेळा जिल्हास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात येतील. या कार्यशाळेला मार्गदर्शक उपस्थित असणे अनिवार्य असणार आहे. या कार्यशाळेसाठी महाविद्यालयातून मार्गदर्शकाला कर्तव्यार्थ रजा मंजूर करून नियमानुसार प्रवासभत्ता/ दैनिक भत्ता मंजूर करावा.

३. मार्गदर्शकाची नेमणूक महाविद्यालयाने केल्याबाबत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या समन्वयासाठी नेमलेल्या संस्थेमार्फत खातरजमा करील.

या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी -युवा माहिती दूत- हे विशेष मोबाईल ॲप्लिकेशन तयार करण्यात आले असून ते गुगल प्ले स्टोर आणि ॲप स्टोरवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. प्रत्येक महाविद्यालयातील मार्गदर्शक आणि सहभागी युवकांचे यामध्ये अकाउंट असणार आहे. या ॲप्लिकेशनमध्ये माहिती दूत मार्गदर्शकांना आयडी आणि पासवर्डच्या आधारे नोंदणी करणे अनिवार्य राहणार आहे. आपल्या महाविद्यालयाचा आयडी आणि पासवर्ड दुसऱ्या पत्रकासोबत पाठवण्यात येईल.

"युवा माहितीदूत" उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विद्यार्थ्यांपर्यंत या उपक्रमाबाबत माहिती पोहचणे गरजेचे आहे. यासाठी मार्गदर्शकांची कृपया नेमणूक करण्यात यावी.

अधिक माहितीसाठी mahitidoot@gmail.com येथे संपर्क करा.

(डॉ.अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :- माहिती व आवश्यक पुढील कार्यवाहीस्तव..

१.सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुबई/ पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त असलेल्या महाविलयांपर्यंत सदर उपक्रमाची माहिती त्वरीत पोहचविण्यात यावी व याबाबतचा पाठपुरवठा करण्यात यावा.

२.संचालक, माहिती व जनसंपर्क, महासंचालनालय, महाराष्ट्र शासन, १७ वा मजला, नविन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई-४०००३२ यांना माहितीसाठी..

महाराष्ट्र शासनाचा

# युवा माहिती दूत

युनिसेफच्या सहकार्याने राज्य शासनाचे उच्च शिक्षण विभाग आणि तंत्र शिक्षण विभाग यांच्या प्रत्यक्ष सहभागाने माहिती व जनसंपर्क महासंचालनालय -युवा माहिती दूत॰ हा उपक्रम हाती घेत आहे. विविध शाखांमध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या महाविद्यालयातील युवकांमार्फत शासकीय योजनांची माहिती प्रस्तावित लाभार्थ्यांपर्यंत थेटपणे पोहचविणे हे -युवा माहिती दूत॰ उपक्रमाचे वैशिष्ट्य आहे.

आजमितीला शासकीय योजनांच्या माहितीचा प्रसार हा मुख्यत्वे वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी वाहिन्या आणि रेडिओ यांच्यामार्फत केला जातो. सोशल मीडियाचा होणारा उपयोग मर्यादित स्वरुपाचा आहे. शिवाय, शासकीय योजनांचे बहुतांश प्रस्तावित लाभार्थी हे अर्धशिक्षित, दारिद्रयरेषेखालील आणि दुर्गम भागातील असल्याने वृत्तपत्रे, दूरचित्रवाणीसंच अथवा रेडिओ ही माध्यमे ते वापरतात असे नाही. प्रस्तावित लाभार्थ्यापर्यंत न पोहचणाऱ्या शासकीय योजना दुहेरी संवादातून त्यांच्यापर्यंत प्रभावीपणे पोहचविण्यासाठी राज्यातील समाजकार्याची आवड असलेल्या उत्साही तरूण वर्गाचे सहाय्य घेण्याचा -युवा माहिती दूत॰ या उपक्रमाचा महत्वाचा उद्देश आहे. राज्यात ६ हजारपेक्षा जास्त महाविद्यालये आहेत. या महाविद्यालयामध्ये एकूण सुमारे २३ लाख पेक्षा जास्त विद्यार्थी शिकत आहेत. त्यापैकी किमान ५ ते ७ टक्के विद्यार्थी म्हणजे किमान १ लाख युवक या उपक्रमात सहभागी होतील अशी अपेक्षा आहे.

## योजनेची अंमलबजावणी:

- प्रत्येक महाविद्यालयातील सहभागी विद्यार्थ्यांमागे १ -मार्गदर्शक॰ नेमण्यात येईल.
- या योजनेच्या अंमलबजावणीसाठी विशेष मोबाईल ॲप्लिकेशन तयार करण्यात आले आहे. या मोबाईल ॲप्लीकेशनमध्ये प्रत्येक महाविद्यालयातील मार्गदर्शक, समन्वयक आणि सहभागी युवक यांचे अकाऊंट असेल. त्याचबरोबर युवकांनी लाभार्थ्यांना द्यावयाची माहिती भरण्याची सोय असेल.

- महाविद्यालयातील विद्यार्थी स्वत: या ॲप्लीकेशनवर स्वत:च्या नावाची नोंदणी करू शकतात.
- युवकांनी लाभार्थ्यांना कोणत्या योजनांची माहिती द्यावी याकरीता तपशिल सांगणारा मजकूर/ व्हिडीओ/ एफएक्यू देण्यात आलेला असेल. त्याशिवाय योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे, अर्जाचे नमुने संबंधित शासकीय कार्यालयाचा संपर्क तपशिल माहिती दिलेली असेल.
- प्रस्तावित लाभार्थ्याची भेट घेतल्यानंतर -युवा माहिती दूत॰ हे त्या लाभार्थ्यांचा तपशिल आपल्या मोबाईलमधील ॲप्लीकेशनमध्ये नोंदवितील या तपशिलानुसार संबंधित योजनांची माहिती ॲप्लीकेशनमधून घेऊन लाभार्थ्यांना समजून सांगतील.
- लाभार्थ्यांना हे ॲप्लीकेशन डाउनलोड करण्यासाठी माहिती दूत प्रेरित करतील. या ॲप्लीकेशनला शासनाचे इतर ॲप्लीकेशन देखील जोडण्यात आले असल्याने सर्व योजना, उपक्रमांची माहिती लाभार्थ्यांना एकाच ठिकाणी मिळणे शक्य होणार आहे.
- माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि माहिती दूत यांमध्ये संदेशांची देवाणघेवाण, प्रशिक्षण, पुर्नविलोकन या ॲप्लीकेशनमार्फत होईल.
- मार्गदर्शक, समन्वयक, माहिती दूत, प्रस्तावित लाभार्थी या सर्वांची नोंदणी मोबाईल क्रमांकाशी निगडीत असेल.
- ज्या योजनेची माहिती युवकांमार्फत प्रस्तावित लाभार्थ्यांना द्यावयाची आहे, त्या योजनेची निवड महासंचालनालय हे सर्व विभागांशी चर्चा केल्यानंतर करेल.
- विविध समाजघटकातील (शेतकरी, महिला, आदिवासी, अल्पसंख्यांक, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती , ज्येष्ठ नागरिक आदी.) असलेल्या वैयक्तिक लाभाच्या किमान ४० योजना, सामुहिक विकासाच्या ५ योजना आणि स्थानिक पातळीवर महत्वाच्या ५ योजना अशा एकूण ५० योजनांचा समावेश या उपक्रमासाठी केलेले असेल.

## कार्यपद्धती

**१) जिल्हा माहिती अधिकारी:**

या उपक्रमाची माहिती होण्यासाठी जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय उद्घाटन कार्यक्रम होणार आहे. यावेळी मार्गदर्शक, समन्वयक आणि माहिती दूत यांची बैठक घेण्यात येईल. विविध महाविद्यालयात कार्यशाळेचे आयोजन करून मार्गदर्शक आणि समन्वयकाच्या माध्यमातून महाविद्यालयांना या उपक्रमात नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येणार आहे.

२) मार्गदर्शक :

प्रत्येक महाविद्यालयात मार्गदर्शक नेमण्यात येणार आहेत. माहिती व जनसंपर्क विभागाकडून देण्यात आलेल्या आयडी आणि पासवर्डच्या माध्यमातून हे मार्गदर्शक महाविद्यालयाची नोंदणी करतील. महाविद्यालयातील अध्यापक/ ग्रंथपाल/ अधीक्षक/ क्रीडा शिक्षक यांची -मार्गदर्शक◦ म्हणून महाविद्यालय निवड करतील. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपैकी इच्छुक माहिती दूतांची निवड करण्याचे काम मागर्दर्शक करणार आहे. त्यानुसार जिल्हा माहिती अधिकाऱ्यांशी समन्वय साधून माहिती दूताची निवड करण्यात येणार आहे.

३) समन्वयक :

-जनसंपर्काची आवड आणि शासकीय योजनांची मुलभूत माहिती असणाऱ्या तसेच विनामानधन जनसेवा बजावू इच्छिणाऱ्या व्यक्तींची समन्वयक म्हणून निवड करण्यात येणार आहे. त्यासाठी निकष ठरवून दिले जातील. समन्वयकाचे काम करू इच्छिणाऱ्या व्यक्ती मोबाईल ॲप्लीकेशनमध्ये आपली नोंद करतील. योजनांचा प्रसार करण्यासाठीचे क्षेत्र निवडण्याचा अधिकार हा माहिती दुताकडे असणार आहे. माहिती दूताच्या शंकांचे निराकरण समन्वयक करील. संबंधित जिल्हा माहिती अधिकारी त्यांच्या जिल्ह्यातील समन्वयकाची निवड करतील. या समन्वयकांना एक दिवसाचे प्रशिक्षण दिले जाईल. माहिती दूत-लाभार्थी-जिल्हा माहिती अधिकारी यांच्यात ते समन्वय साधतील.

४) युवा माहिती दूत

- या उपक्रमासाठी स्वेच्छेने तयार असलेल्या/ निवडण्यात आलेल्या सुमारे १ लाख विद्यार्थ्यांना ६ महिन्याच्या कालावधीसाठी -युवा माहिती दूत◦ म्हणून संबोधण्यात येईल.

- या कालावधीत किमान ५० प्रस्तावित लाभार्थ्यांच्या घरी जाऊन, त्यांच्याशी संपर्क साधून त्यांच्यासाठी लागू असणाऱ्या योजनांची माहिती देतील.
- लाभार्थ्यांशी अथवा त्यांच्या परिसराशी निगडित विकास कामांची माहिती देऊन संबंधितांच्या प्रतिक्रियेची नोंद करतील.
- या योजनेच्या प्रसिध्दीकरिता सोशल मिडियाचाही उपयोग करण्यात येईल.

**प्रोत्साहन:**

- -युवा माहिती दूत॰ म्हणून काम केल्यामुळे राज्यशासनाकरिता तळागाळाच्या पातळीवर काम करण्याची महत्वाची संधी युवकांना मिळेल.
- -युवा माहिती दूत॰ अशी ओळख राज्यशासनाच्यावतीने त्यांना देण्यात येईल.
- ठरवून दिलेले काम केल्यानंतर त्यांना शासनाचे डिजिटल प्रमाणपत्र देण्यात येईल.
- या उपक्रमात काम करत असताना सोईचे व्हावे म्हणून त्यांना दैनंदिनी, पेन, आदी. देण्यात येईल.

**या उपक्रमातून :**

- किमान १ लाख युवक राज्य शासनाच्या किमान ५० योजनांच्या माहितीशी जोडले जातील.
- या १ लाख युवकांमार्फत किमान ५० लाख प्रस्तावित लाभार्थ्यांशी म्हणजेच किमान २ ते २.५० कोटी व्यक्तींशी शासन जोडले जाईल.
- युवकांच्या समाजमाध्यमातील प्रभावी वापराचा शासकीय योजनांच्या प्रसारासाठी लाभ होईल.

०००